प्रेसनोट

जा.क. ७४१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २५/१०/२०१७

## '' खुनाचे गुन्हयात आरोपीस आजन्म कारावास व द्रव्यदंडाची शिक्षा''

**भंडारा** :– भंडारा जिल्हयातील पोलीस स्टेशन वरठी अंतर्गत मौजा पाहुनी येथिल सौ. कविता राधेशाम मिरासे हिला जाळल्यावरुन शासकीय रुग्णालय, भंडारा येथे दाखल केल्याचे माहिती वरुन पो. स्टे. भंडारा चे पोलीस नाईक विरेंद्र कापसे, बं. नं. ५२७ यांनी सामान्य रुग्नालय भंडारा येथे जावुन जळीत पिडीतेचा बयाण घेतला असता तिने आपल्या बयाणात सांगीतले की, दिनांक ०९/०६/२०१६ रोजी पिडितचे पती नामे राधेशाम मिरासे सायंकाळी ७.३० वाजता दरम्यान दारु पिवुन घरी आले व पिडितेने दारु पिण्याबद्दल हटकले असता पिडितेस शिवीगाळ केली आणि दारुचे नशेत व रागाचे भरात घरातील कापड रॉकेलने ओला करुन गॅसवर पेटवुन सौ. कविता मिरासे हिचे अंगावर फेकला त्यामुळे पिडितेचे अंगावरील कपडयानी पेट घेवुन पिडिता जळाल्याने जोरात ओरडली व मदतीसाठी धावली आरोपी नामे राधेशाम मिरासे व शेजाऱ्यांनी पिडितेचे अंगावर चादर टाकुन आग विझवली व तिला सामान्य रुग्नालय भंडारा येथे उपचारा करीता दाखल केले असे बयाण दिले तिने आपले बयाणात सदरचे कृत्य राधेशाम मिरासे यानेच केल्याचे सांगीतल्याने पो. ना. कापसे यांचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे वरठली येथे अप क्र.६४/१६ कलम ३०७ भांदवि अन्वये गुन्हा नोंद केला.

सदर गुन्हयाचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक सुधिर वर्मा व पथकातील पोहवा. नितीन शिवणकर, पो. शि. त्रिमुर्ती लांडगे यांनी सुरु केला व गुन्हयात **आरोपी नामे राधेशाम अमरकंठ मिरासे, वय ३० वर्ष, रा. पाहुनी** यास अटक केली. ८० ते ९० टक्के जळालेल्या पिडितेचा उपचारा दरम्यान दिनांक १२/०६/२०६ ला सामान्य रुग्नालय भंडारा येथे मरण पावल्याने गुन्हयात कलम ३०२ भ.द.वि. वाढवुन तपास पुर्ण करुन आरोपी विरुध्द जिल्हा व सत्र न्यायालय, भंडारा येथे दोषारोपपत्र दाखल केले.

सदर गुन्हयाची सुनावणी **मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री. संजय देशमुख** यांचे समक्ष चालली. गुन्हयात सरकार पक्षातर्फे सहायक सरकारी अभियोक्ता श्री. विश्वास तवले यांनी योग्य साक्षदारांची पडताळणी करुन बाजु मांडली. आज दिनांक ३१/१०/२०१७ रोजी गुन्हयात **आरोपी नामे राधेशाम अमरकंठ मिरासे**, **वय ३० वर्ष रा. पाहुनी** यास भां.दं.वि. कलम ३०७,३०२ अन्वये दोषी ठरवुन **आजन्म कारावास व ५०००/—रुपये दंड, दंड न भरल्यास एक महिना सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली.** सदर गुन्हयात पोलीस नाईक सुरेश ढोबळे यांचे मार्गदर्शनात पो. हवा. सुकरु वलके बं. नं. ६३० पो. स्टे. वरठी यांनी पैरवी अधिकारी म्हणुन कामकाज केले.

**(कृपया समोरच्या पहील्या पानावर देण्यास विनंती)**

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता